महाराष्ट्र शासन
# शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर
(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था).
विद्यानगर, कोल्हापूर ४१६००४ दुरध्वनी : (०२३१) २५२१०३८
(कार्या.), २५२१०१६ (वै.फॅक्स), E-Mail – gpkolhapur@yahoo.com

जा.क्र.शातंनिको/विवि/कोरोना/२०२०/ 1117 दिनांक:- 17 MAR 2020

**विद्यार्थ्यांकरीता अत्यंत महत्त्वाची सुचना**

विषय:- कोराना विषाणू (कोव्हिड १९)चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना करणेबाबत.

संदर्भ:-१.मा.सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांचे पत्र क्र.तंशिविकापु/ विवि/सर्वसाधारण /२०२०/१३५७ दिनांक १४/०३/२०२०.

२. मा.जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांचे पत्र क्र.कक्ष/कोरोना विषाणू/२०२०/आरआर-६८३ दिनांक १५/०३/२०२०.

३. सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दि.१४ मार्च,२०२०

उपरोक्त विषयान्वये कोरोना विषाणूच्या (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने राज्यात साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ दिनांक १३/०३/२०२० पासून लागू केलेला असून त्यातील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे व सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दि.१४ मार्च,२०२० अन्वये नियमावली प्रसिध्द केलेली आहे.

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणून संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते कि दि. ३१/०३/२०२० पर्यंत संस्थेचे संपुर्ण शैक्षणिक कामकाज बंद राहील याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी सुटटीच्या कालावधीत अनावश्यकरित्या बाहेर फिरणे टाळावे. वसतीगृहात राहणा-या विद्यार्थ्यांनी स्वत:च्या मुळगावी जावे, तसेच वसतीगृहामध्ये राहणा-या विद्यार्थ्यांनी स्वत:च्या आरोग्याबाबत योग्य ती काळजी घ्यावी. आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाहीत यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्यात यावी.

प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर

प्रति :- १. मुख्य सुचनाफलकांवर लावणेसाठी.
२. श्री. इंगळे, प्रोग्रामर यांनी संस्थेच्या संकेतस्थळांवर प्रदर्शित करणेसाठी
३. सर्व विभाग प्रमुख यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.
४. वसतीगृह कुलमंत्री,यांना सुचित करण्यात येते की, संदर्भ १ च्या परिपत्रकातील सुचनांचे तंतोतंत पालन करून वसतीगृहातील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.

प्रत:-१) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधि. कोल्हापूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा.सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.